# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### सोलापूर जिल्ह्यातील वीज वितरण कंपनीच्या निष्क्रीय कारभारामुळे पाच हजार बीपीएल धारक कुटुंब अंधारात असल्याबाबत

**(१) २५८४३ (१०-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील १७ हजार ७४४ कुटुंबांना भरल्यानंतरही वीज वितरण कंपनीच्या निष्क्रीय कारभारामुळे विद्युत पुरवठा करण्यात आला नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना प्राधान्याने घरगूती वीजपुरवठा करण्याचा नियम असतानाही तब्बल पाच हजार बीपीएल धारक कुटूंबाना वीज अद्याप मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंधारात असलेल्या येथील कुटूंबाना तातडीने वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१), (२) व (३) सोलापूर जिल्ह्यामध्ये माहे मे, २०१५ अखेर एकूण १७,७४४ घरगुती ग्राहक वीज जोडणीसाठी पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी ५६२३ (सर्वसाधारण प्रवर्गातील ५५२३ व दारिद्रय रेषेखालील १०० लाभार्थ्यांना) वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. प्रतिक्षा यादीपैकी प्रलंबित ४३६२ दारिद्रय रेषेखालील लाभार्थी यांचा दीनदयाल उपाध्याक्ष ग्राम ज्योती योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळे (जि.सोलापूर) येथील माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्थेच्या संचालकांनी केलेला गैरव्यवहार**

**(२) २६३९४ (१४-०९-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळे (जि.सोलापूर) येथील माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्थेच्या संचालकांनी प्रवासभत्ता, उपस्थिती भत्ता, ऑडीट फी, जागा खरेदी, लाभांश वाटप इ. मध्ये सुमारे अडीच कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे चौकशीत स्पष्ट झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०१-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये करण्यात आलेल्या चौकशीनुसार १६ संचालक व १ कर्मचारी (सचिव) यांचेवर आर्थिक गैरव्यवहाराची रु.१,३५,५४,०५७/- इतक्या रक्कमेची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

संस्थेचे तत्कालीन संचालक मंडळ दि.१६.५.२०१५ रोजी बरखास्त करुन अधिनियमाच्या कलम ७८ (अ) (१) (अ) (ब) नुसार प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर संस्थेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन सद्यस्थितीत नविन संचालक मंडळ कार्यरत आहे. आर्थिक गैरव्यवहाराची जबाबदारी निश्चित करण्यात आलेल्या संचालक व कर्मचारी यांचेकडून सदर रक्कमेची वसूली करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र सरकारच्या दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती व एकात्मिक उर्जा विकास या दोन योजनांची राज्यात अंमलबजावणी करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याबाबत**

**(३) ४०५५६ (२०-०४-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संजय पुराम (आमगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती आणि एकात्मिक उर्जा विकास या दोन योजनांची राज्यात अंमलबजावणी करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजना अमलात आल्यानंतर राज्यातील २५५ शहरांना २४ तास वीज पुरवठा केला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनांच्या अंमलबजावणी साठी विजवितरण प्रणालीचे विस्तारीकरण आणि बळकटीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) दोन्ही योजनांद्वारे राज्यातील वीज ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठा करण्याचे धोरण आहे.
(३) दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेमध्ये ग्रामीण भागातील १२,४८,४७४ घरगुती ग्राहकांना नवीन वीज जोडणी देणेसाठी पायाभुत सुविधा उभारणी करणे, तसेच घरगुती ग्राहकांपैकी ३,९४,१४१ दारिद्ररेषेखालील लाभार्थीसहित नवीन वीज जोडणी देणे, ८३७ वाहिन्याचे वाहिनी विलगीकरण करणे, वीज वितरण प्रणाली सक्षमीकरण करणे, सांसद आदर्श ग्रामयोजनेच्या ६९ गावांमध्ये वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण करणे या कामाचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये २१५ नवीन उपकेंद्रे, १०० उपकेंद्रांची रोहित्र क्षमतावाढ, १०,९२४ वितरण रोहित्रे, १९,४१७ किमी उच्चदाब वाहिनी, ६२१८.४ किमी लघुदाब वाहिनी उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. एकात्मिक ऊर्जा विकास योजनेमध्ये शहरी भागात ३,४९८ किलोव्हॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारणे, ६,२१,४७३ नवीन मिटर बसविणे या कामांचा समावेश आहे. राज्यातील २५४ शहरामध्ये वीज वितरण प्रणाली सक्षमीकरण करण्यासाठी १२८ नवीन उपकेंद्रे, ८९ उपकेंद्रांची रोहित्र क्षमतावाढ, ५७०५ वितरण रोहित्रे, ४५३२.०२ किमी उच्चदाब वाहिनी, ३२३९.९५ किमी लघुदाब वाहिनी उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. दोन्ही योजनातंर्गत निविदा प्रक्रिया महावितरण कंपनीमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इलेक्ट्रीसिटी कायदा २००३ सेक्शन ५५ नुसार सर्व वीज ग्राहकांना २ वर्षाच्या आत वीज मीटर बसविणे अनिवार्य असतानाही ते बसविण्यात आले नसल्याबाबत**

**(४) ४१०६३ (२०-०४-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इलेक्ट्रीसिटी कायदा २००३ सेक्शन ५५ नुसार सर्व वीज ग्राहकांना २ वर्षाच्या आत वीज मीटर बसविणे अनिवार्य असतानाही ते बसविण्यात आले नाही हे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास वीज नियामक आयोगाच्या केस क्र. १२१ ऑफ २०१४ संदर्भातील २६ जून २०१५ च्या आदेशातील २.१०.१४ प्रमाणे महावितरण ने फक्त ५५ टक्के कृषी ग्राहकांना आजतागायत वीज मीटर बसविलेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास ७५ टक्के कृषी ग्राहक वगळता बाकी सर्व कृषी ग्राहकांना वीज मीटर बसविले नाहीत, त्या कृषी ग्राहकांना अंदाजित वीज देयके आकारण्यात येतात का तसेच कृषी ग्राहकांना देण्यात येणारे अंदाजित वीज देयके हे पूर्ण वर्षभराच्या वीजपुरवठा करण्याच्या कालावधीसाठी आकारण्यात येतात, हे खरे आहे काय,

(४) असल्यास यामुळे कृषी ग्राहकांवर न वापरलेल्या विजेचा ही देयकांचा (पिक हंगामा व्यतिरिक्त आकारण्यात अलेल्या वीज देयकांचा) अतिरिक्त बोजा पडतो, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ह्या अतिरिक्त वीज देयकांमुळे महाराष्ट्र सरकार कडून महावितरणला देण्यात येणाऱ्या ७५ टक्के कृषी अनुदानाचा शासनावर अतिरिक्त बोजा पडून परिणामी शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाच्या आर्थिक नुकसानासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सुमारे ६०% कृषी ग्राहकांना वीज मीटर बसविण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

मीटर असलेल्या कृषी ग्राहकांना मीटर वाचनाप्रमाणे तसेच विना मीटर कृषी ग्राहकांना मा.वीज नियामक आयोगाने मंजूरी दिलेल्या प्रति अश्वशक्ती प्रति महिना दराने वीज बिलाची आकारणी करण्यात येते. मा.वीज नियामक आयोगाने मंजूरी दिलेल्या वीज दरात सवलत देण्यात येऊन कृषी ग्राहकांना सवलतीच्या दराने वीज पुरवठा करण्यात येतो.

(४) हे खरे नाही.

विना मीटर कृषी ग्राहकांना मासिक वीज दर मा.वीज नियामक आयोगातर्फे सदर ग्राहकांच्या वार्षिक वीज वापर वर्गवारीच्या आधारे ठरविण्यात आलेला आहे. तसेच मीटर असलेल्या कृषी ग्राहकांना मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके आकारली जातात.

(५), (६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्हयात १ हजार १३३ मेगावॅटची निर्मिती होत असतानांही जिल्हयांत भारनियमन केले जात असल्याबाबत

**(५) ४१९०४ (१७-०५-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयाची सहाशे मेगावॅट इतकी विजेची मागणी असतांना सद्यस्थितीत पारंपारिकसह विविध स्त्रोतांच्या माध्यमातून सुमारे १ हजार १३३ मेगावॅटची निर्मिती होत

असतानांही जिल्ह्यांच्या विविध भागात विजेचे भार नियमन केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने विजेचा पुरवठा करुन भारनियमन कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७)** :(१) जिल्ह्यातील स्थानिक वीजेची निर्मिती व भारनियमन हे विषय परस्पराशी संबंधित नाहीत. मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे, संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी लागू असलेल्या निर्देशानुसार भारनियमन केले जाते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील सरकारी कार्यालयातील अनेक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(६) ४२५२७ (२९-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील अनुक्रमे वसई, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा, पालघर, तलासरी, डहाणू या आदिवासी बहुल तालुक्यांच्या विकास कामाकरीता अद्ययावत सरकारी कार्यालयातील अनेक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक संघटना, आदिवासी बांधवांच्या वतीने मा. मंत्री (आदिवासी विकास), मा.मंत्री (महसूल), आयुक्त, महसूल(कोकण विभाग), जिल्हाधिकारी (पालघर) यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदिवासी बांधवांच्या तक्रारीबाबत आदिवासी जनतेला विकास कामाची गरज निश्चित करुन कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत तोडगा काढण्याच्या उद्देशाने कोणता धडक कृती कार्यक्रम शासनातर्फे गठीत करण्यात आला वा येत आहे,
(३) असल्यास, सदर बाबतीत ठोस निर्णय किती कालावधीत अपेक्षीत आहे,
(४) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७)** :(१), (२), (३) व (४) होय.
पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाची तलाठी व लिपीक संवर्गाची भरती करण्यात आलेली असून जिल्हा परिषद पालघर यांच्या कार्यालयातील रिक्त पदे भरणेसंदर्भात शासनाचा कालबध्द कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे. ग्रामविकास विभाग यांचेकडील शा.नि., दि.२२.०७.२०१६ नुसार जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे विकल्प अंतिम टप्प्यात असून विकल्पानुसार कर्मचाऱ्यांचे समायोजन झाल्यानंतर जिल्हापरिषदेतंर्गत रिक्त पदांची कर्मचारी

भरतीची प्रक्रिया करण्यात येईल. तसेच महसूल व वन विभाग यांचेकडील शा.नि. दि.१९.०८.२०१६ नुसार जिल्हाधिकारी कार्यालयातंर्गत कर्मचाऱ्यांचे विकल्पानुसार समायोजन अंतिम टप्प्यात असून समायोजन झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातंर्गत अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, लघुटंकलेखक, वाहन चालक व शिपाई / स्वच्छक/ पहारेकरी यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**वसई तहसिल कार्यालयाचे मागील २ वर्षाचे सुमारे १० लाखांचे वीज बिल न भरल्याने महावितरणने या कार्यालयाची वीज तोडल्याबाबत**

**(७) ४२७९६ (२०-०४-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तहसिल कार्यालयाचे मागील २ वर्षाचे सुमारे १० लाखांचे वीज बिल न भरल्याने महावितरण कंपनीने या कार्यालयाची वीज तोडली असल्यामुळे सर्वसामान्यांची कामे होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याप्ररणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीनुसार तहसिल कार्यालयाचे दोन वर्षाचे वीज बिल भरुन येथील वीजपुरवठा सुरळीत करुन सर्वसामान्यांची कामे होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७)** :(१),(२) व (३) वसई तहसिल कार्यालयातील ग्राहक क्र.००१५१०१२०२०१ चे रु.८,४१,१८०/- थकीत वीज बिल न भरल्यामुळे दिनांक ६.१.२०१६ रोजी महावितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला होता. सदर वीजपुरवठा लगेच दुसऱ्या दिवशी पुर्ववत करण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथील पावरलुम धारकाकरिता वीज दर कायम ठेवण्याबाबत**

**(८) ४२९२१ (२०-०४-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील पावरलुम धारकाकरीता वीज दर कायम ठेवण्याबाबत व उर्जा संबंधित असलेल्या विविध मागण्यांबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) लघुदान यंत्रमागधारकांच्या वीज दरामध्ये सुसूत्रीकरण आणण्यासाठी शासनाने दिनांक ७.११.२०१५ च्या शासन निर्णयाद्वारे व दिनांक ३.१२.२०१५ च्या शुध्दीपत्रकाद्वारे सवलतीचे दर लागू केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे राज्यातील वीज निर्मिती संच बंद असतानांही महानिर्मितीच्या वितरण विभागाने दामदुप्पटीने वीजदर आकारणी केल्याबाबत**

**(९) ४३०९६ (२०-०४-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे राज्यातील वीज निर्मिती संच बंद असतानांही महानिर्मितीच्या वितरण विभागाने ग्राहकांकडून दामदुप्पटीने वीजदर आकारणी करण्याची कार्यवाही सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वीजदर आकारणीमुळे व्यावसायिक, शेतकरी व घरगुती वीजग्राहक तसेच मुंबईला वीज पुरवठा करणारी बेस्ट, रिलायन्स आणि टाटा या वीज कंपन्यांचे ग्राहकही त्रस्त झाले असल्याच्या तक्रारी वीजग्राहक व व्यावसायिकांकडून महावितरण कंपनीस वारंवार पाठविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यस, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने वीजेचे वाढीव दर कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही. वीज दर हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून वार्षिक स्वरूपात निश्चित केले जातात. बंद वीजनिर्मिती संचाचा वीज आकाराशी संबंध नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील विश्रांतवाडी परिसरातील टिंगरे नगरमधील हॉटेल समईच्या व्यवस्थापनाने वीज मिटरमध्ये फेरफार करुन २९,०९१ युनिटची वीज चोरी केल्याबाबत**

**(१०) ४४४२९ (२०-०४-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दि. ३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास, पुणे शहरातील विश्रांतवाडी परिसरातील टिंगरे नगरमधील हॉटेल समईच्या व्यवस्थापनाने वीज मिटरमध्ये फेरफार करुन २९,०९१ युनिटची वीज चोरी केल्याची बाब पुणे महामंडळचे मुख्य अभियंता रामराव मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता,व अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी धाडी टाकल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास या धाडीत, हॉटेलचे वीज जोडणीधारक कमल मिरेकर व वीज वापरणारे शिवराम राय यांच्याविरोधात सदर हॉटेल समईच्या व्यवस्थापनाकडून दंडासह किती रक्कम वसुल करण्यात आली आहे,

(३) असल्यास, पूर्ण रकमेचा भरणा न करता या हॉटेलला सध्या वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्यात आला असून हॉटेलच्या दंडाची व मूळ बिलाची रक्कम हप्त्या हप्त्याने भरण्याची हॉटेल प्रशासनाची केलेली मागणी मान्य करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) वीज चोरीची निर्धारण रक्कम रु.५,१९,०५०/- व तडजोड रक्कम रु.२,९०,०००/- वसूल केलेली आहे.

(३) हे खरे नाही.

हॉटेल प्रशासनाकडून तडजोड रक्कम हप्त्याने भरण्याची मागणी करण्यात आलेली नव्हती. परंतु, महावितरण कंपनीकडून तडतोड रक्कमेचे बिल देताना प्रति किलो वॅट रु.५,०००/- ऐवजी रु.४,०००/- किलो वॅट दराने ५८ किलो वॅट भारासाठी रु.२,३२,०००/- तडजोड रक्कम नजर चुकीने आकारण्यात आली. सदरची चूक लक्षात आल्याने ग्राहकाकडून तडजोउ रक्कमेच्या फरकापोटी पुन्हा रु.५८,०००/- भरुन घेण्यात आली. त्यामुळे तडजोड रक्कम दोन टप्प्यात भरल्याचे दिसुन येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऊर्जा विभागाने राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, रायगड व रत्नागिरी या पाच जिल्ह्यांमध्ये सन २०१४-१५ साठी १४ हजार कृषी पंपाच्या वीज जोडणीच्या उद्दिष्टाबाबत**

**(११) ४४९०९ (२०-०४-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊर्जा विभागाने राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, रायगड व रत्नागिरी या पाच

जिल्ह्यांमध्ये सन २०१४-१५ साठी १४ हजार कृषी पंपाच्या वीज जोडणीचे उद्दिष्टे ठेवले होते, प्रत्यक्षात मात्र केवळ ५ हजार कृषीपंपानाच वीज मिळू शकली आहे तसेच कोल्हापूर जिल्हयात कृषिपंपाच्या तीन हजार विदयूत जोडण्या प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असल्याने निर्देशांची योग्य अंमलबजावणी करण्यात न आल्याने राज्यातील कृषीपंपाच्या विद्युतीकरणाचा अनुशेष प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत अनुशेष दूर करण्यासाठी काही उपाययोजना केली आहे काय वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७)** :(१) हे अशंतः खरे आहे. राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, रायगड व रत्नागिरी या पाच जिल्हयांतील कृषीपंपाचा अनुशेष दूर करण्यासाठी सन २०१४-१५ साठी १४,००० कृषीपंप ऊर्जीकरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. सन २०१४-१५ मध्ये रु.१५४ कोटी इतका निधी मंजूर होता. त्यामधून वरील ५ जिल्हयात ८२४२ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले. तसेच कोल्हापूर जिल्हयात मार्च, २०१५ अखेर ७५२७ इतके कृषी पंप पैसे भरुन प्रलंबित होते. तसेच नोव्हेंबर, २०१५ अखेरीस ८३६१ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. सन २०१५-१६ या वर्षात कोल्हापूर जिल्हयांमध्ये ५५८७ कृषीपंपाना वीज जोडण्या दिल्या आहेत.

(२) व (३) सन २०१५-१६ मध्ये अनुशेष योजनेंतर्गत राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, रायगड व रत्नागिरी या पाच जिल्हयांमधील अनुशेष दूर करण्यासाठी १२५०० कृषीपंप ऊर्जीकरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यासाठी सन २०१५-१६ करिता रु.२२० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. सन २०१५-१६ मध्ये वरील पाच जिल्हयात १२१९४ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आलेले आहे. मार्च, २०१५ अखेर या पाच जिल्हयांमध्ये एकूण अनुशेष २६८०३ होता. तो कमी होऊन मार्च, २०१६ अखेर १५०१४ इतका अनुशेष बाकी आहे. तसेच वर्ष २०१६-१७ करिता रु.२५८.७२ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नगरदेवळा (जि.जळगाव) येथील सबस्टेशन पासून गाव व पेठ भागासाठी स्वतंत्र वीज पुरवठा करण्यासंदर्भात**

**(१२) ४५९५८ (२०-०४-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरदेवळा (जि.जळगाव) येथील सबस्टेशन पासून गाव व पेठ भागासाठी स्वतंत्र वीज पुरवठा करण्यात यावा,अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी माहे ओगस्ट, २०१५ च्या सुमारास वीज कंपनीकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास त्यांचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) अशा प्रकारची मागणी महावितरण कंपनीस प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजूरा व कोरपना तालुक्यातील (जि.चंद्रपुर) येथील वर्धा नदी पट्ट्यात कमी दाबाचा विज पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयीपासून वंचीत राहावे लागत असल्याबाबत**

**(१३) ४६३५३ (२०-०४-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजूरा व कोरपना तालुकयातील (जि.चंद्रपुर) येथील वर्धा नदी पट्ट्यात कमी दाबाचा विज पुरवठा होत असल्याने शेतातील सतत बंद असलेल्या मोटारपंपामुळे शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयीपासून वंचीत राहावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्धा नदी पट्ट्यातील कोलगांव, कढोली (बु.) मानोली, बबापुर, चार्ली, पेल्लोरा, मार्डा, नांदगाव, जैतापूर, अंतरगाव, गोयगाव व अन्य गावांतील कमी दाबाच्या विज पुरवठ्यामुळे मोटारपंप जास्त काळ बंद राहत असल्याने कापुस, मिर्ची, सोयाबिन, चना आदी पिकांना सिंचन करता येत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय ,
(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने विजेचा दाब वाढविण्यासाठी उपकेंद्र स्थापन करण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
वरील काळात माहे नोव्हेंबर, डिसेंबर २०१५ मध्ये अंतरगाव व गोयगाव येथे कमी दाबाच्या वीज पुरवठ्याची समस्या निर्माण झाली होती. तसेच वर्धा नदी पट्यातील कोलगांव, कढोली (बु), मानोली, बाबापुर, चार्ली, पेल्लोरा, मार्डा, नांदगाव व जैतापूर येथे कृषीपंपाच्या वापरामुळे विद्युत भार माहे डिसेंबर महिन्यात वाढतो. त्यामुळे कमी दाबाच्या वीज पुरवठ्याची समस्या निर्माण होते.
(३) महावितरण कंपनीने चौकशी केली.

(४) गोयगाव येथील कमी दाबाच्या वीज पुरवठ्याची समस्या सोडविण्यासाठी गोयगाव हे गाव ११ के.व्ही. पिंपळगांव वाहिनीवरुन ३३ के.व्ही. उपकेंद्र गडचांदूर येथून निघालेल्या स्वतंत्र ११ के.व्ही एल ॲन्ड टी या वाहिनीवर स्थानांतरीत करण्यात आले आहे. त्यामुळे गोयगाव येथे कमी दाबाच्या वीज पुरवठ्याच्या समस्येचे निवारण झाले आहे.
अंतरगाव तसेच राजुरा तालुक्यातील मानोली, बाबापुर, चार्ली, जैतापूर येथील कमी दाबाच्या वीज पुरवठ्याची समस्या सोडविण्यासाठी दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत ३३ के.व्ही. चे नविन उपकेंद्र अनुक्रमे नारंडा व वरोडा येथे मंजूर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ पांढरकवडा येथील महावितरणचे विद्यूत डी.पी चे अचानक व्होल्टेज वाढविल्यामुळे नागरिकांच्या घरातील टी.व्ही., फ्रीज, इत्यादी इलेक्ट्रिक साहित्य निकामी झाल्याबाबत**

**(१४) ४६५४० (२०-०४-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ पांढरकवडा येथील महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांच्या दुर्लक्षामुळे विद्यूत डी.पी चा अचानक हाय व्होल्टेज वाढल्याने नागरिकांच्या घरातील टी.व्ही., फ्रीज, इत्यादी इलेक्ट्रिक साहित्य निकामी झाल्याची घटना माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या सुमारास घडली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार महावितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) दि.२४.०१.२०१६ रोजी पांढरकवडा येथील सिंघानिया नगर भागातील वितरण रोहित्रावर तांत्रिक बिघाड झाल्यामुळे लघुदाबवाहिनीचा अचानक वीजदाब वाढल्यामुळे सदर परिसरातील नागरिकांच्या घरातील उपकरणे जळाल्याची तक्रार स्थानिक वीज वितरण केंद्रास प्राप्त झाली होती.
(२) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(३) सदर घटना ही तांत्रिक बाबींमुळे झालेली असून त्यामध्ये कुठलाही अधिकारी वा कर्मचारी दोषी नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कोप्रोली सव्हे नं. ३२ हिस्सा नं. ४९ ( ता. पनवेल, जि. रायगड) या जागेतील शेतक-यांची कुठलीही परवानगी न घेता वीज कंपनीने लोखंडी पोल उभे केल्याबाबत**

**(१५) ४६८४३ (२०-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोप्रोली सर्व्हे नं. ३२ हिस्सा नं. ४९ ( ता. पनवेल, जि. रायगड) या जागेतील शेतक-यांची कुठलीही परवानगी न घेता वीज कंपनीने लोखंडी पोल उभे करुन स्टेट लाईन मेगावॅट पॉवर च्या वीज प्रवाह तारा नेण्यात आल्या असल्याने तेथील स्थानिक शेतकऱ्यांनी हे पोल काढून टाकण्याबाबत कार्यकारी अभियंता, ता. पनवेल, जि. रायगड व अन्य संबधित अधिका-यांना दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१), (२), (३) व (४) संबंधित ठिकाणी तलाठी व महावितरणच्या कर्मचा-यांनी प्रत्यक्ष स्थळपहाणी केली असता सदर ठिकाणी कोणताही विद्युत पोल आढळला नाही.

---

**पुणे महानगरप्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात बेकायदेशीर अनधिकृत बांधकामांना वीज पुरवठा न करणेबाबत**

**(१६) ४७२११ (२०-०४-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरप्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात बेकायदेशीर/अनधिकृत बांधकामांना वीज पुरवठा करु नये असे आदेश मा.आयुक्त यांनी मा.मुख्य अभियंता, महावितरण यांना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने .आयुक्त, पीएमआरडीए यांनी दिलेल्या आदेशानुसार महावितरण यांनी काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.

यासंदर्भात मा.आयुक्त, पुणे यांचे पत्र दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी महावितरणच्या क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२) व (३) याप्रकरणी महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली असून त्याअनुषंगाने अनधिकृत बांधकामांना वीज जोडणी देताना महावितरण कंपनीने विद्युत कायदा, २००३ च्या अधीन राहून वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश संबंधित क्षेत्रीय कार्यालयास दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे तोरणे (ता.खेड, जि.पुणे) येथील विजेचे पोल वाकले असल्याबाबत**

**(१७) ४७३७८ (२०-०४-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तोरणे (ता.खेड,जि.पुणे) येथील विजेचे पोल वाकले असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाकलेले विजेचा पोल खाली कोसळून दुर्घटना होऊ नये याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता खेड यांना दिनांक ३०जानेवारी २०१६ रोजी वा दरम्यान निवेदन दिले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय, महावितरण कंपनीने चौकशी केली आहे.

(४) महावितरण कंपनीने मौजे तोरणे (ता.खेड, जि.पुणे) या गावी दि.११.०२.२०१६ रोजी सदरील गावातील विद्युत लघुदाब वाहिनीस लागणा-या झाडांच्या फांद्या तोडणे, वाकलेले पोल सरळ करणे इ.देखभाल दुरुस्तीची कामे केलेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा (जि लातूर) तालुक्यातील विद्युत वितरणाच्या ग्राहकाच्या तक्रारी व कामाबाबत**

**(१८) ४७४२० (२०-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि लातूर) तालुक्यातील मौजे, लखनगाव, उटी बु., बऱ्हाणपूर, समदर्गा, कोरंगळा, सत्तरधरवाडी, काळमाथा, कवठा, बोरगाव न.,आंदोरा, बिरवली, टाका, शिंदाळा लो., शिंदाळवाडी आदि गावातील विद्युत वितरण ग्राहकांच्या तक्रारीची व घरगुती व शेती पंपाच्या विद्युत पुरवठ्याच्या कामाबाबत चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत

लातूर ग्रामीण येथील लोकप्रतीनिधी यांनी दिनांक १३ जानेवारी २०१६ रोजी अधीक्षक अभियंता,म.रा.वि.मंडळ, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे हे खरे आहे काय.

(२) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले व सदर विद्युत पुरवठ्याची कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनिधीनी दिनांक १३.०१.२०१६ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने लखनगांव, उटी बु.बहाणपूर, समदर्गा, कोरंगळा, सत्तरधरवाडी, काळमाथा, कवठा, बोरगांवन, आंदोरा, बिरवली, टाका, शिंदाळा लो. शिंदाळवाडी (ता.औसा, जि.लातूर) आदि गावातील विद्युत वितरण ग्राहकांच्या तक्रारीची व घरगुती व शेतीपंपाच्या विद्युत पुरवठ्याची कामे करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिंदळे (ता.भडगाव जि.जळगाव) परिसरात वीज नसल्याने**
**पाच दिवस अंधारात असल्याबाबत**

**(१९) ४७७४२ (२०-०४-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिंदळे (ता.भडगाव जि.जळगाव) परिसरात दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी पासून वीज नसल्याने पाच दिवस अंधारात होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील वीज तारा जीर्ण होऊन, ट्रान्सफार्मरची ही दुरावस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच आकडेधारकांच्या ही अतिक्रमणामुळे येथे वीज पुरवठा पूर्ण वेळ होत नाही हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सदर गावातील दोन सिंगल फेज रोहित्र दि.१८.०१.२०१६ रोजी नादुरुस्त झाल्यामुळे गावातील काही भाग अंदाजे ४ ते ५ तास अंधारात होता. नविन/दुरुस्त सिंगल फेज रोहित्र उपलब्ध नसल्यामुळे सदर गावातील ग्राहकांना पाणी पुरवठा योजनेच्या थ्री-फेज रोहित्राव्दारे वीज पुरवठा करण्यात आला होता.

(२) हे खरे आहे.

गावातील काही भागातील वीज तारा जिर्ण झालेल्या आहेत तसेच गावातील काही ट्रान्सफॉर्मरचे डिस्ट्रीब्युशन बॉक्स खराब झालेले आहेत.

(३) हे खरे आहे.

परंतु वीज चोरी संदर्भात वेळोवेळी महावितरणतर्फे कार्यवाही करण्यात येते.

(४) सदर प्रकरणी महावितरण कंपनीने चौकशी केली आहे.

(५) गावातील काही भागातील जिर्ण झालेल्या तारा ओ.ॲन्ड एम. योजनेअंतर्गत बदलण्याचे काम सुरु आहे. तसेच ट्रान्सफॉर्मर्सच्या डिस्ट्रिब्युशन बॉक्स मधील खराब झालेले किट-कॅट, फ्युज व लग्ज बदलण्यात आले आहेत. गावातील वीज चोरीचे प्रमाण कमी करण्यासाठी वीज चोरी पकडण्यासाठीची मोहिम राबविण्यात येऊन माहे डिसेंबर, २०१५ व जानेवारी, २०१६ मध्ये एकूण १५ जणांवर विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. तसेच त्यांना वीज चोरीची बिले आकारण्यात येऊन त्याच्या विरुध्द नाशिक पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील यंत्रमाग वीज ग्राहकांच्या वीजदरात सुधारणा करून २.६६ रूपये प्रती युनिट दराने वीज पुरवठा करण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(२०) ४७७८९ (२०-०४-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमाग वीज ग्राहकांच्या वीजदरात सुधारणा करून २.६६ रूपये प्रती युनिट दराने वीज पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दराव्यतिरिक्त इंधन अधिभार, वीज शुल्क व इतर आकार यामध्ये मोठी वाढ झाल्यामुळे प्रत्यक्षात यंत्रमाग ग्राहकांना ४.२२ रूपये प्रती दराने वीज पुरवठा सुरू आहे, हे सुध्दा खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वीजदरामध्ये सुधारणा करून सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, यंत्रमाग वीज ग्राहक, व इतर अनेक संघटनांकडून वेळोवेळी करण्यात आली आहे, हे  खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने  सदर मागणीबाबत  कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अशंत: खरे आहे.

महावितरणच्या इतर ग्राहकांप्रमाणे यंत्रमाग ग्राहकांना सुध्दा वीज आकारा व्यतिरिक्त स्थिर आकार, इंधन समायोजन आकार, वीज शुल्क व इतर आकार लागू असल्यामुळे प्रत्यक्ष प्रति युनिट भरणा करावयाचा दर हा वीज आकाराच्या दरापेक्षा जास्त असतो.
(३) हे खरे आहे.
(४) लघुदाब यंत्रमागधारकांच्या वीज दरामध्ये सुसूत्रीकरण आणण्यासाठी शासनाने सवलतीच्या वीज दरामध्ये सुधारणा केलेली असून रु.२.३३ प्रति युनिट असा सवलतीचा दर लागू केलेला आहे.
(५) लघुदाब यंत्रमागधाकांच्या वीज दरामध्ये सुसूत्रीकरण आणण्यासाठी शासनाने सवलतीच्या वीज दरामध्ये शासन निर्णय दिनांक ७.११.२०१५ व शुध्दीपत्रक दिनांक ३.१२.२०१५ अन्वये सुधारणा केलेली आहे. तसेच लघुदाब यंत्रमागधारकांना सुधारित इंधन समायोजन आकार मार्च, २०१६ पासून लागू करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हयात रब्बी पिकाला पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांच्या कृषीपंपाला कमी दाबाचा विजपुरवठा होत असल्याबाबत

**(२१) ४८३७४ (२०-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात रब्बी पिकाला पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांच्या कृषीपंपाला कमी दाबाचा विजपुरवठा होत असल्याने कृषीपंपासोबतचे असलेले रोहित्र याचे जळण्याचे प्रमाण वाढले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोहित्राची वाहतूक करण्यासाठी शेतकऱ्याना खर्च देण्याची मा .उर्जामंत्री यांनी घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय आहे,
(३) असल्यास प्रश्न भाग (१) व (२) याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ,
(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) माहे नोव्हेंबर, २०१५ दरम्यान रब्बी हंगाम असल्यामुळे कृषीपंपधारकांच्या वीज वापरात वाढ झाली होती. त्यामुळे रोहित्र व ११ केव्ही वाहिन्या अतिभारीत झाल्याने रोहित्र जळण्याचे प्रमाण वाढले होते.

(२) जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे दिनांक ८/१०/२०१५ रोजी महावितरण कंपनीच्या विकास कामाच्या झालेल्या आढावा बैठकीत रोहित्र वाहतुकीसाठी लागणारा खर्च महावितरणने करावा, जर शेतकऱ्यांनी अथवा ग्राहकांनी खर्च केला असेल तर त्याची प्रतिपूर्ती कंपनीच्या नियमाप्रमाणे करावी, असे निर्देशित केले होते.

(३) होय, महावितरण कंपनीने चौकशी केली आहे.

(४) माहे नोव्हेंबर, २०१५ दरम्यान रब्बी हंगाम असल्यामुळे कृषीपंपधारकांच्या वीज वापरात वाढ झाल्याने रोहित्र व वाहिन्या अतिभारीत झाल्याने रोहित्र जळण्याचे प्रमाण वाढले होते. ज्या ठिकाणी कमी दाबाने वीज पुरवठा होत होता त्या ठिकाणची विद्युत प्रणाली सुधारण्यासाठी, विविध योजनेमध्ये नविन उपकेंद्र, सद्य:स्थितीतील उपकेंद्रात अतिरिक्त रोहित्र, वितरण रोहित्र, उच्चदाब वाहिनी व लघुदाब वाहिन्यांची कामे करण्यात आली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच आढावा बैठकीत निर्देशित केल्यानुसार हिंगोली मंडळ कार्यालयाअंतर्गत हिंगोली उपविभागामधील जळालेल्या रोहित्राची वाहतूक करणेसाठी एका एजन्सीला कंत्राट देण्यात आलेले आहे. तसेच इतर ठिकाणी नादुरुस्त व दुरुस्त रोहित्रांची वाहतूक करण्यासाठी महावितरणकडून विभागनिहाय निविदा काढून कंत्राट देण्यात आलेले आहे. अपवादात्मक परिस्थितीत जर ग्राहकांनी रोहित्राची वाहतूक केली असेल तर वाहतूक खर्चाची महावितरणकडून प्रतिपूर्ती स्थानिक पातळीवर करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड तालुक्यात (जि.पुणे) वीजग्राहकांची वीज वितरणकडून जादा वीजबिले आकारली जात असल्याबाबत

**(२२) ४८४५४ (२०-०४-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यात (जि.पुणे) वीजग्राहकांची वीज वितरणकडून जादा वीजबिले आकारून फसवणूक केली जात असल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कार्यकारी अभियंता, खेड यांना माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून त्या अनुषंगाने विज वितरणच्या दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यां विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

(४) संचयित आलेल्या बिलांना नियमाप्रमाणे Slab Benefit तसेच टप्याने बिले भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच मीटर रिडींग एजन्सीचे मीटर वाचनाचे काम बंद करण्यात आलेले आहे. दोषी कर्मचा-यांकडून खुलासा मागवून त्याच्यावर कंपनीच्या नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ व मराठवाड्यातील उद्योगांना स्वस्त दरात वीज मिळणेबाबत**

**(२३) ४८६४५ (२०-०४-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ व मराठवाड्यातील उद्योगांना माहे एप्रिल, २०१६ पासून स्वस्त दरात वीज पुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भ व मराठवाड्याच्या धर्तीवर कोकणातील रत्नागिरीतील लोटे परशुराम व रायगड येथील उद्योगांना स्वस्त दरात वीज पुरवठा करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उदयोगांना स्वस्त वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) विदर्भ व मराठवाडा विभागातील औद्योगिक मागासलेपण विचारात घेऊन शासनाने त्या ठिकाणी नवीन उद्योग उभे राहावेत या दृष्टीने त्या भागातील उद्योगांना वीजदरात सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण भागात किमान २० तास अखंडित वीजपुरवठा व्हावा या प्रमुख उद्देशाने सिंगल फेज सह अक्षय प्रकाश योजना राज्यात सुरु करण्याबाबत**

**(२४) ४९०९० (२०-०४-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात किमान २० तास अखंडित वीजपुरवठा व्हावा या प्रमुख उद्देशाने सिंगल फेज सह अक्षय प्रकाश योजना राज्यात सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात ही सिंगल फेज योजना फोल ठरली असून दहा-बारा तासांच्या अघोषित भारनियमनामुळे शेतीसह बाजारपेठेचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू सिंगल फेज व अक्षय योजनेतून नागरिकांना व शेतकऱ्यांना वीज योग्य प्रकारे वितरण होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७)** :(१) ग्रामीण भागात सिंगल फेज वाहिनी, गावठाण वाहिनी व एस.डी.टी. बसविलेल्या कृषी वाहिन्या व्दारे सिंगल फेज पुरवठा केला जातो. सध्या अक्षय प्रकाश योजना बंद आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सिंगल फेज वीज पुरवड्याचा दर्जा सुधारण्याकरीता दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना या केंद्र शासनाच्या योजनेतंर्गत मालेगांव मंडळांमध्ये वाहिनी विलगीकरणासाठी अनुक्रमे ५५ व ९५ वाहिन्यांचे विलगीकरणांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील गावठाण भागासह उपनगरांमध्ये महावितरणाचे अनाच्छादित मिनीफिडर तसेच लोंबकळणाऱ्या वीज तारा याबाबात महावितरणकडे केलेली तक्रार**

**(२५) ४९१५९ (२०-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील गावठाण भागासह उपनगरांमध्ये महावितरणाचे उघडे मिनीफिडर तसेच लोंबकळणाऱ्या वीज तारा याबाबात नागरिक वारंवार महावितरणाकडे तक्रार करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरणाच्या बेजबाबदार कारभारामुळे निष्पाप लोकांचा बळी जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या उघड्या मिनीफिडर व लोंबकळणाऱ्या तारा यांची दुरुस्ती करण्यासंदर्भात तक्रार करुनही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरची दुरुस्ती तातडीने करण्यासंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. महावितरणच्या लाईन जवळ अथवा खाली बांधकामे करणे, अनाधिकृत वाढीव बांधकाम इत्यादी मुळे अपघात घडतात.

(३) नाशिक शहरात गावठाण भागासह उपनगरांमध्ये महावितरणच्या मिनीफिडर पिलरचे झाकणे काही ठिकाणी नाहीत अशा ठिकाणी महावितरणकडून पुन्हा दरवाजे बसविले जात आहेत. तसेच शहरातील आवश्यक त्या ठिकाणी भूमिगत वाहिन्या केल्या असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) ६६१९ मिनी पिलर उभारणे/बदली करणे/दुरुस्ती करणे तसेच १६०.१० उपरी उच्चदाब वाहिनी भुमीगत करणे तसेच ४४०.९० कि.मी. उपरी लघुदाब वाहिनी भूमिगत करण्याची कामे महावितरण तसेच नाशिक महानगरपालिका यांचे माध्यमातून करण्यात आली आहेत.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील गोरगरीब, कष्टकरी, भूमिहिन आदिवासीच्या जमिनीचे पट्टे कायमस्वरुपी देण्याबाबत

**(२६) ४९३२२ (२०-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील गोरगरीब, कष्टकरी, भूमिहिन आदिवासी लोकांनी उदरनिर्वाहामध्ये अतिक्रमित जमीनीवर मशागत करुन शेती करीत आहेत मात्र ही शेती त्यांच्या नावावर नसल्याने त्यांना अनेक अडचणी येतात यासाठी सदर जमिनीचे पट्टे कायमस्वरुपी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी मा. जिल्हाधिकारी याच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमिनीचे पट्टे कायमस्वरुपी देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

मात्र, वनहक्क कायद्यातंर्गत प्रकरणे निकाली काढण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांची भेट घेऊन मौखिक चर्चा केली आहे.

(२) याप्रकरणी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडून कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ सुधारणा नियम, २०१२ नुसार वैयक्तिक व सामुहिक वनहक्क दावे निकाली काढण्याच्या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यामध्ये जिल्हास्तरीय व उपविभाग स्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे.

उपविभागस्तरीय समितीकडून जिल्हास्तरीय समितीकडे प्राप्त झालेल्या एकूण ३२३ दाव्यांपैकी २६६ दावे मंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच उपविभागस्तरीय समितीने अपात्र घोषित केलेल्या ८९ दाव्यांसंदर्भात त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दावेदारांना देण्यात आली आहे. सदर ८९ वैयक्तिक दाव्यांवर जिल्हास्तरीय समितीने निर्णय घेणे आहे.

---

## सिंधुदूर्ग जिल्हयात वीज कंपनीच्या निकृष्ट कामामुळे वीजेच्या शॉट सर्किटमुळे जंगम व स्थावर मिळकतीचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याबाबत

**(२७) ४९४८८ (२०-०४-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयात वीज कंपनीच्या निकृष्ट कामामुळे वीजेच्या शॉट सर्किटमुळे जंगम व स्थावर मिळकतीचे मोठया प्रमाणात नुकसान होऊन नुकसान भरपाई देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजेच्या शॉर्ट सर्किटमुळे माध्यमातून घरे, मांगर, बागायती, दुकाने आदींच्या नुकसानीची मदत देण्याची मागणी मा.ऊर्जा मंत्री, पालकमंत्री व वीजनियामक मंडळ आदींकडे स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरीक यांचेकडून सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :द**(१), (२), (३), (४) व (५) याबाबत नुकसान भरपाई देण्याबाबतचे महावितरणने स्वयंस्पष्ट परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यानुसार सर्व बाबींची शहानिशा करुन नुकसान भरपाईची प्रकरणे त्वरीत निकाली काढली जातात.

---

## केंद्र सरकार व महावितरणच्या वतीने उर्जा बचतीसाठी वितरीत होत असलेल्या एलईडी बल्बची अधिक दराने विक्री करुन काळाबाजार करीत असल्याबाबत

**(२८) ४९८७१ (१७-०५-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकार व महावितरणच्या वतीने उर्जा बचतीसाठी वितरीत होत असलेल्या एलईडी बल्बची अधिक दराने विक्री होत असून बल्बचा काळाबाजार होत असल्याचे दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणचे नियंत्रण नसल्याने बाजारात जास्त किंमत घेऊन एलईडी बल्बची विक्री करुन ग्राहकांची लूट करीत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने काळाबाजार करुन ग्राहकांची लुट करण्याऱ्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात येत आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) काळाबाजार करुन ग्राहकांची लूट करणाऱ्या विरुध्द त्वरीत कार्यवाही करण्याची सूचना महावितरणतर्फे मे.ईईएसएल यांना देण्यात आली मे. ईईएसएलने संबधित एजन्सीमार्फत बल्ब विक्री त्वरीत बंद केली आहे. तसेच सदर प्रकरणाची तक्रार केल्यानंतर पोलीस स्टेशनने तक्रारीची दखल घेवून एजन्सीला ताकीद दिली आहे. ह्याशिवाय महावितरणतर्फे सदर बल्बची चढ्यादराने विक्री होत असल्याने मे.एनर्जी एफशिएन्सी सर्विसेस लि.च्या अधिका-यांना कळविण्यात यावे असे विविध वृत्त पत्राव्दारे ग्राहकांना आवाहन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यात चार हजार एकर सिंचन क्षमता असणारा वारा जहाँगीर प्रकल्पाचे काम पूर्ण होऊण पाणी साठविण्यात आले असले तरी विद्युत पुरवठा नसल्याबाबत**

**(२९) ५०२६० (२०-०४-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात चार हजार एकर सिंचन क्षमता असणारा वारा जहाँगीर प्रकल्पाचे काम पूर्ण होऊण पाणी साठविण्यात आले असले तरी विद्युत पुरवठा नसल्याने येथील शेतकरी सिंचनापासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने येथील दुष्काळजन्य स्थिती पहाता शेतकऱ्यांना सिंचन करता यावे यासाठी तातडीने विद्युत पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) वाशिम जिल्ह्यातील वारा जहाँगीर सिंचन प्रकल्पांतर्गत मंगळूरपीर व वाशिम तालुक्याचा काही भाग येत असून सदर तालुक्यामध्ये सन २०१५-१६ मध्ये १९९१ कृषीपंपाचे उर्जीकरण करण्यात आले असून मार्च, २०१६ अखेर १९५४ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. तसेच, सन २०१६-१७ मध्ये सदर तालुक्यांमध्ये विविध योजनांतर्गत जून, २०१६ अखेर १९८ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित कृषीपंपांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) सदर प्रकरणी महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) विदर्भ व मराठवाड्यातील कृषीपंपाना वीजजोडणी देण्याकरीता सन २०१६-१७ करिता रु.४५० कोटी इतक्या निधींची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. त्यामध्ये वाशीम जिल्ह्यासाठी २३२२ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्याकरीता रु.२२.४४ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यात दुष्काळ परिस्थतीत वीज वितरण विशेष पथकाव्दारे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून वीज बीलाची सक्तीने वसूली केली जात असल्याबाबत**

**(३०) ५०५५३ (२०-०४-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यात महावितरण कडून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विशेष वसूली पथकाव्दारे ग्रामीण भागातील विद्युत ग्राहकांच्या थकीत वीज बिलाची सक्तीने वसूली करीत असल्याचे माहे जानेवारी २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्हा दुष्काळग्रस्त असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकडून वीज बीलाची थकित रक्कम वसूल करण्यात येवून नये अशी मागणी वारंवार वितरण कंपनीकडे करण्यात येत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुष्काळग्रस्त भागात सुरु असलेल्या सक्तीच्या वीज बिल वसूलीस स्थगिती देण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात आला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) दुष्काळग्रस्त भागातील कृषी पंपाच्या थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी वीज पुरवठा खंडीत न करण्याचे आदेश देण्यात आले होते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माण तालुक्यात (जि.सातारा) शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी उपलब्ध असतानाही केवळ विजेअभावी पाणी न दिल्याने पिके कापून गेल्याबाबत**

**(३१) ५१०१० (२०-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माण तालुक्यात (जि.सातारा) येथील शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी उपलब्ध असतानाही

केवळ विजे अभावी पाणी न मिळाल्याने पिके करपून गेली असल्याने शेतक-यांमध्ये असंतोष पसरला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विज पुरवठा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७)** :(१) माण तालुक्यातील मार्च, २०१५ अखेर प्रलंबित असलेल्या ग्राहकांपैकी पायाभुत विकास आराखडा-२ योजनेतंर्गत तरतुद उपलब्ध असलेल्या ग्राहकांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून उर्वरित ग्राहकांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) होय.

(३) माण तालुक्यामध्ये मार्च, २०१५ अखेर शेतीपंपाचे ६४७ ग्राहक पैसे भूरन प्रलंबित होते. त्यापैकी माहे एप्रिल, २०१५ ते मार्च, २०१६ या कालावधीत पायाभुत विकास आराखडा-२ योजनेतंर्गत ४३१ शेतीपंप वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. मार्च, २०१६ अखेर ९८३ ग्राहक पैसे भरुन प्रलंबित आहेत. त्यापैकी माहे एप्रिल, २०१६ ते मे, २०१६ या कालावधीत ३५ शेतीपंप वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच एकूण १२२ शेतीपंपाना वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वसई-विरार विभागातील ग्रामीण भागातील दिनदयाळ उपाध्याम ग्रामीण ज्योत योजने अंतर्गत प्रस्तावित कामांना निधी देण्याबाबत

**(३२) ५१२८९ (२०-०४-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार विभागातील ग्रामीण भागातील दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण योजनेंतर्गत प्रस्तावित असलेल्या कामांना तातडीने निधी उपलब्ध करुन द्यावा याबाबत दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी मा.उर्जा मंत्री यांच्या कडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावातील कामांना अद्याप निधी उपलब्ध करुन दिला नसल्यामुळे कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

दीनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजनेच्या ३३ जिल्ह्यातील रु.२१५२.६८ कोटी किमतीच्या ३७ प्रकल्पास केंद्रशासनाकडून जिल्हानिहाय मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्यामध्ये पालघर जिल्ह्याकरिता रु.६१.४९ कोटी इतकी रक्कम मंजूर केलेली असून निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथे नव्याने सुरु झालेल्या शेळगी पोलीस चौकीने अनाधिकृतपणे वीज जोडणी घेतल्याबाबत**

**(३३) ५२२५४ (२०-०४-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथे नव्याने सुरु झालेल्या शेळगी पोलीस चौकीने अनाधिकृतपणे वीज जोडणी घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने वीज जोडणी घेणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती दंडात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७)** :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ व मराठवाड्यातील उद्योगांना सवलतीच्या दरात विजपुरवठा करण्याबाबत**

**(३४) ५२४७९ (२०-०४-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ व मराठवाडयातील उद्योगांना सवलतीच्या दरात विजपुरवठा करण्यात येणार असल्याचा प्रस्ताव १५ दिवसात मंत्रिमंडळासमोर माडण्यात येईल अशी माहिती मा.उर्जा मंत्री यांनी नागपूरात दिली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे प.महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील उर्वरित भागांतील उद्योगांचे अस्तिव धोक्यात येऊ शकते अशी भिती व्यक्त करुन नाशिकमधील उद्योजकांनी आंदोलन करण्याची घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय.
(४) विदर्भ व मराठवाडा विभागातील उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याबाबत शासन निर्णय दि.२९.६.२०१६ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले असून सदर सवलतीचा फायदा विदर्भ व मराठवाडा व्यतिरिक्त उत्तर महाराष्ट्र D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांनाही मिळत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगर जिल्हयातील श्रीरामपूर येथील मुळा प्रवरा वीज संस्थेला नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(३५) ५३६४२ (१६-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर जिल्हयातील श्रीरामपूर येथील मुळा-प्रवरा वीज संस्थेची वितरण व्यवस्था व मालमत्तेचा वापर केल्याप्रकरणी एकूण ४ अब्ज २३ कोटी ८३ लाख रुपये द्यावेत, व तसेच प्रत्येक महिन्याला भाडे म्हणून सव्वाचार कोटी रुपये मुळा-प्रवरा संस्थेला द्यावेत असे आदेश वीज नियामक आयोगाने महावितरण वीज कंपनीला माहे मे २०१६ मध्ये दिला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने मुळा-प्रवरा वीज संस्थेला वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार रक्कम देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशाविरुध्द महावितरणने मा.ॲपटेल, नवी दिल्ली येथे अपिल दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) मा.ॲपटेलने दिलेल्या निदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली असून दरमहा निश्चित केलेली रक्कम महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग व मुळा प्रवरा संस्था यांना अदा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळुरपिर तालुक्यातील (जि.वाशिम) येथील विज ग्राहकांना महावितरण विज कंपनीने ज्यादा रक्कमेच्या पाठविलेल्या बिलाबाबत**

**(३६) ५४३३४ (१६-०८-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळुरपिर तालुक्यातील (जि.वाशिम) येथील विज ग्राहकांना महावितरण विज कंपनीने ज्यादा रक्कमेची बिले पाठविले असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने महावितरण वीज कंपनीने ग्राहकांना ज्यादा रक्कमेची पाठविलेली बिल कमी करुन देण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

महावितरण कंपनीतर्फे मंगळूरपिर तालुका/उपविभागामध्ये वीज ग्राहकांचे फोटो मिटर वाचन घेण्याकरीता नेमण्यात आलेल्या सर्व एजन्सींचे कर्मचारी प्रत्यक्ष व नियमितपणे ग्राहकाच्या घरी जाऊन मिटर वाचन करतात. तसेच या सर्व वीज ग्राहकांचे विद्युत मिटरच्या रिडींगचे फोटो काढून तसेच शहरी भागातील वीज ग्राहकांच्या विद्युत मिटरच्या रिडींगचे एच.एच.यु.मशिनच्या सहाय्याने ग्राहकांनी वापरलेल्या वीज ग्राहकांना बिल वाटप करण्यापूर्वी चुकीचे वा अवास्तव वीजदेयक संगणक बिलींग प्रणालीमधून निघाल्यास उप विभागीय पातळीवर अशा वीज देयकाची तपासणी/शहानिशा करुन योग्य वीज देयके वाटप करण्यात येतात. माहे मार्च, २०१६ वा त्या सुमारास ग्राहकांना योग्य वीज देयके देण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टाटा पॉवरने वीज दरात सरासरी ४.४ टक्के वाढ करण्याच्या दिलेल्या प्रस्तावाबाबत**

**(३७) ५४५८६ (१६-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाटा पॉवरने वीज दरात सरासरी ४.४ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव राज्य वीज नियामक आयोगाकडे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या सुमारास सादर केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेस्ट, टाटा पॉवर आणि रिलायन्स इफ्रा या तिन्ही कंपन्याच्या ५०० युनिटपर्यंत वीज वापरणा-या वीज ग्राहकांचे दर समान बाबत अभ्यास सुरु आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भातील सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, १०० ते २०० युनिटच्या वीज वापर असलेल्या निवासी ग्राहकांसाठी एक समान वीज दर लागू करण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये संबंधितास निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विजेसंदर्भातील पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने शासनाने इन्फ्रा -२ या योजनेअंतर्गत वाशिम जिल्हयाला सुमारे १०२ कोटी रुपयांचा निधी दिल्याबाबत

**(३८) ५४६७४ (१६-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विजेसंदर्भातील पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने शासनाने इन्फ्रा २ या योजनेअंतर्गत वाशिम जिल्हयाला सुमारे १०२ कोटी रुपयांचा निधी दिला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या माध्यमातून सुरु असलेली कामे गेल्या वर्षभरापासून प्रलंबित आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले,व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.

वाशिम जिल्ह्याकरीता पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने इन्फ्रा-२ योजनेअंतर्गत ११३.२१ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) वाशिम जिल्ह्यातील इन्फ्रा-२ योजनेचे काम मे. कस्तुम इंजिनीअर्स, या कंत्राटदारास दिनांक ६.८.२०१४ रोजी देण्यात आले. कामाची प्रगती मासिक उद्दिष्टांपेक्षा कमी असल्यामुळे सदर कंत्राटदारास दोन वेळा नोटीस टू करेक्ट देण्यात आल्या आहेत. तसेच रु.१८.७९ कोटीचे

काम सदर कंत्राटदाराकडून काढून घेऊन त्या कामाच्या निविदा स्थानिक पातळीवर मार्च, २०१६ मध्ये काढण्यात आल्या असून ही कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शेती पंपाच्या वीज कनेक्शन व मीटर जोडणीसाठी एका शेतकऱ्याकडून २५०० रुपयाची लाच घेतल्याप्रकरणी विद्युत वितरण सहाय्यक अभियंता यांना अटक केल्याबाबत**

**(३९) ५४९९६ (१६-०८-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेती पंपाच्या वीज कनेक्शन व मीटर जोडणीसाठी एका शेतकऱ्याकडून २५०० रुपयाची लाच घेतल्याप्रकरणी विद्युत वितरण सहाय्यक अभियंता मलकापूर (ता. कऱ्हाड, जि. सातारा) यांना दिनांक २७ एप्रिल २०१६ रोजी वा त्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याप्रकरणी अटक केलेल्या संबंधित दोषी अधिकाऱ्याची विभागीय चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने त्यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१२-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) महावितरण कंपनीकडून संबंधित अधिका-यास निलंबित करण्यात आले असून मुख्य अभियंता, बारामती यांच्या स्तरावर विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

---

**अमरावती जिल्हयातील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या मध्ये आयटीआयच्या माजी शिकाऊ विद्यार्थ्यांना वाढीव विदयावेतन न मिळाल्याबाबत**

**(४०) ५६०५१ (१६-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या मध्ये आयटीआय च्या माजी शिकाऊ विद्यार्थ्यांना गेल्या ६ महिन्यापासून वाढीव विद्यावेतन मिळाले नसल्याने याबाबत अमरावती जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम, उद्योंग व पर्यावरण यांचेकडे दिनांक.२७ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनावर शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने या विद्यार्थ्यांना वाढीव विद्यावेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१२-२०१६) :**(१) मा.पालकमंत्री, अमरावती यांना यासंदर्भात दिलेल्या निवेदनाची प्रत महावितरण कंपनीस प्राप्त झाली आहे.
(२) व (३) महावितरण कंपनीकडून आय.टी.आय.शिकाऊ उमेदवारांना दि.०५.०५.२०१५ पासून वाढीव विद्यावेतन देण्यात येत आहे. तसेच तिवसा उपविभाग, जि.अमरावती येथील निवेदन सादर केलेल्या माजी शिकाऊ उमेदवारांना वाढीव विद्यावेतनाचा फरक दि.२१.०७.२०१६ रोजी महावितरण कंपनीने अदा केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वन हक्क कायदा लागू असताना महापालिका क्षेत्रातील आदिवासी व इतर अनुसूचित जमातीतील वस्त्या पाड्यांना कोणत्याही मूलभूत सुविधा पुरविल्या जात नसल्याबाबत**

**(४१) ५७६४६ (२४-०८-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन हक्क कायदा लागू असताना महापालिका क्षेत्रातील आदिवासी व इतर अनुसूचित जमातीतील वस्त्या पाड्यांना कोणत्याही मूलभूत सुविधा पुरविल्या जात नाही, हे खरे आहे काय,
(२) याबाबत ठाणे येथील वन हक्क समितीने वेळोवेळी मागणी करुनही महापालिका प्रशासन तांत्रिक अडचणी निर्माण करुन आदिवासींचे मुलभूत हक्क नाकारित आहे, हे खरे आहे काय,
(३) या प्रकरणी संबंधित प्रशासनातील अधिकाऱ्यांची उच्च स्तरीय चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.वहका-२०१५/प्र.क्र.६१/का-१४, दिनांक ०८ सप्टेंबर, २०१५ अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ ची नगर परिषद/नगर पालिका व महानगर पालिका क्षेत्रात अंमलबजावणी करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

(२) नाही.

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत ज्या ठिकाणी वनक्षेत्र आहे अशा ठिकाणी असलेल्या वसाहतींना ठाणे महानगरपालिकेने एकूण रु. ९५१.५१ लक्ष इतक्या किंमतीची महानगरपालिकेच्या निधीतून विविध कामे करुन मुलभूत सुविधा पुरविलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा तालुक्यात मीटर रिडींग घेण्यासाठी एजन्सी नियुक्त करण्याबाबत**

**(४२) ५८२१७ (१६-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा तालुक्यात शेतीपंपाच्या मीटरचे रिडींग न घेताच अंदाजावर बिलाची आकारणी करण्याचे धक्कादायक प्रकार घडत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मीटर रिडींग घेण्यासाठी एजन्सीची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) मंगळवेढा उपविभागांतर्गत मीटर असलेल्या कृषीपंप ग्राहकांचे रिडींग घेण्यासाठी एजन्सी उपलब्ध होत नसल्याने कंपनीच्या क्षेत्रीय कर्मचा-यांमार्फत रिडींग घेण्यात येते. कृषीपंप ग्राहकांचे रिडींग घेण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रीय अधिका-यांना महावितरणमार्फत देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात महापारेषण मध्ये सहाय्यक अभियंता या पदासाठी दि. १ ते ३ जून, २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षा प्रक्रियेत अनेक त्रुटी व दोष आढळल्याबाबत**

**(४३) ६०२६१ (१६-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महापारेषण मध्ये सहाय्यक अभियंता या पदासाठी दिनांक. १ ते ३ जून, २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षा प्रक्रियेत अनेक त्रुटी व दोष आढळल्याने या ऑनलाईन परिक्षेची चौकशी करुन फेरपरिक्षा घेण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १२ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास निवेदनाच्या अनुषंगाने, महापारेषणाच्या ऑनलाईन सदोष परिक्षा प्रक्रियेची चौकशी करण्यात आली आहे,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने सदरची फेरपरिक्षा घेण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-१२-२०१६) :**(१) निवेदनाची प्रत प्राप्त झाली आहे.

(२) होय.

(३) परीक्षेत हजर असलेल्या उमेदवारांची पुन्हा लेखी परीक्षा घेण्याचा निर्णय महापारेषण कंपनीने घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृष्णूर (जि.नांदेड) उपकेंद्रार्गत असलेल्या रुई (बु). फिडरच्या कामावर काम करणाऱ्या एका खाजगी कामगाराचा उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मोठा अपघात झाल्याबाबत**

**(४४) ६१०२३ (१८-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णूर (जि.नांदेड) उपकेंद्रार्गत असलेल्या रुई (बु). फिडरच्या कामावर काम करणाऱ्या एका खाजगी कामगाराचा उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मोठा अपघात होऊन तो रुग्णालयात मृत्यूशी झुज देत असूनही महावितरण कंपनीकडून अदयापर्पत कोणतीही मदत दिली नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने अपघातग्रस्त व्यक्तीस आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) दि.२४.५.२०१६ रोजी श्री. कोंडीबा मारोती बतलवाड, रा.बंजारवाडी ही अनधिकृत बाहेरील व्यक्ती लाईन परमिट घेतलेल्या ११ के.व्ही. रुई वाहिनी या विद्युत पुरवठा बंद असलेल्या खांबावरुन पडल्याची घटना घडली होती.

(२) व (३) या प्रकरणी विद्युत निरिक्षक कार्यालय, नांदेड यांनी महावितरणकडे सादर केलेल्या अहवालानुसार सदर व्यक्तीकडे कोणताही विद्युतीकरणाचा परवाना नसताना तसेच कोणालाही न सांगता वंजारवाडी फाट्याजवळील वीज विद्युत वाहिनीच्या सिमेंट पोलवर चढली व तोल जाऊन खाली पडली. सदरचा अपघात हा यांत्रिकी असून तो सदर व्यक्तीचा स्वत:च्या निष्काळजीपणामुळे घडला आहे. त्यामुळे त्यांस वीज वितरण कंपनीच्या नियमानुसार आर्थिक मदत करता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुर्तिजापूर मतदार संघात (जि.अकोला) मे.महा ॲक्टीव कंपनी, औरंगाबाद यांनी इन्फ्रा मधील ट्रान्सफार्मर उभारण्याची कामे न केल्याबाबत**

**(४५) ६१९०१ (१८-०८-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर मतदार संघात (जि.अकोला) मे.महा ॲक्टीव कंपनी, औरंगाबाद यांनी इन्फ्रा मधील ट्रान्सफार्मर उभारण्याची कामे न केल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी (मूर्तिजापूर) यांनी लेखी निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २४ डिसेंबर, २००५ रोजी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने इन्फ्रामधील ट्रान्सफार्मर उभारण्याची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) हे खरे आहे.

सदर तक्रार मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दि.२४.१२.२०१५ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली होती.

(२) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) अकोला ग्रामीण विभागाचे पायाभूत आराखडा-२ योजनेचे काम मे. महाॲक्टीव्ह इंजिनिअर्स जेव्ही देवगिरी इन्फ्रा स्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीला दि.१७.१.२०१५ रोजी देण्यात आले असून काम पूर्ण करण्याचा कालावधी २ वर्षाचा आहे. यामध्ये एकूण ४५० नवीन वितरण रोहित्रांच्या कामाचा समावेश असून माहे सप्टेंबर, २०१६ पर्यंत ३५० रोहित्रांचे काम पुर्ण करण्याचे उद्दीष्ट होते. त्यापैकी १६१ रोहित्रांचे काम पूर्ण झाले असून ४५ रोहित्रांचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच रोहित्र क्षमतावाढीचे माहे सप्टेंबर, २०१६ अखरेपर्यंत ७५ रोहित्रांचे उद्दीष्ट असताना ७६ रोहित्र क्षमतावाढीची कामे पुर्ण झाली आहेत. सदर कंत्राटदाराने काम मासिक उद्दिष्टापेक्षा कमी असल्यामुळे तीन वेळा नोटीस टु करेक्ट देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर कंत्राटदारास निविदा कालावधीत सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ-मराठवाडा आत्महत्याग्रस्त क्षेत्रातील बेरोजगार युवकांसाठी नवीन उद्योगाला सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याबाबत**

**(४६) ६३४१२ (१८-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विदर्भ-मराठवाडा आत्महत्याग्रस्त क्षेत्रातील बेरोजगार युवकांसाठी नवीन उद्योग

ग्रामीण क्षेत्रात विकसीत करण्यासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात एक हजार कोटीची तरतुद केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नवीन छोटया उद्योगाला विज कमी सवलतीच्या दराने उपलब्ध करुन देऊन बंद पडलेले उद्योग पुन्हा शासनामार्फत सुरु करण्यात येणार आहेत काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने नवीन उद्योगाला सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+विभागातील उद्योगांना चालना देण्यासाठी औद्योगिक ग्राहकांना वीजेच्या दरात सवलत देण्याची योजना शासन निर्णय दि.२९.६.२०१६ नुसार जाहीर करण्यात आली आहे.
(२) विदर्भ, मराठवाडा विभागात स्थापित होणा-या नवीन उद्योगांकरीता रु.०.७५/ युनिट व उत्तर महाराष्ट्र D व D+ क्षेत्रात स्थापित होणा-या नवीन उद्योगांकरीता रु.०.५०/ युनिट सवलत देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना वीज दरात सवलत देण्यासाठी शासनाने औद्योगिक ग्राहकांना (अ) इंधन समायोजन आकार, (ब) उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित व (क) नवीन उद्योगांकरीता प्रोत्साहनपर सवलत जुलै, २०१६ पासून देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र व राज्य शासनाकडून कोलामाचे जिवनमान उंचविण्यासाठी विविध योजना राबविण्यात येणेबाबत**

**(४७) ६३६८४ (१२-०८-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य शासनाकडून कोलामाचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत असतांना जिल्हा प्रशासन चंद्रपूर यांच्या दुलर्क्षतेमुळे जीवती तालुक्यातील कोलाम जमात सदर योजनांपासून वंचित असल्याचे माहे मे २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात आढळून आले आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुढे काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) तसेच जीवती तालुक्यातील कोलामांचे जीवनमान उंचविण्यासाठी मागील दोन वर्षात शासनाच्या कोणत्या योजना राबविण्यात आले आहेत?
**श्री. विष्णु सवरा (२०-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) जीवती तालुक्यातील आदिम लाभार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणा-या घरकुल बांधून देणे, अवजार पुरवठा, खते व बियाणे पुरवठा, ठिंबक सिंचन ताडपत्री मिशन वाटप, शिलाई मशीन वाटप, तेलपंप वाटप या योजनांतर्गत सन २००९-१० पासून २४३ लाभार्थ्यांना लाभ दिलेला असून त्यासाठी सुमारे रु.२.०० कोटी इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे.

---

**मुकुटबन (ता.झरी, जि.यवतमाळ) येथील महावितरणच्या मनमानी कारभाराला कंटाळून नागरिकांनी महवितरण कंपनीवर काढलेला मोर्चा**

**(४८) ६३९६८ (१८-०८-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुकुटबन (ता.झरी, जि.यवतमाळ) येथील महावितरणच्या मनमानी कारभाराला कंटाळून येथील नागरिकांनी दिनांक.११.जून.२०१६ रोजी महावितरण कार्यालयावर मोर्चा काढून विविध मागण्यांचे निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने उक्त निवेदनाच्या मागण्यांवर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) होय, महावितरण कंपनीमार्फत चौकशी केली आहे.
(३) निवेदनातील सर्व मुद्यांवर महावितरणतर्फे खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१) महावितरणकडून प्रत्येक ट्रान्सफॉर्मरवर ए.बी.स्वीच व डिस्ट्रीब्यूशन बॉक्स लावण्यात येऊन ज्या ठिकाणी दुरुस्तीची आवश्यकता असते तेथे त्वरित दुरुस्ती करण्यात येते.

२) मुकुटबन येथून निघणाऱ्या ११ के.व्ही. वीज वाहिन्यांवर दोन ठिकाणी ए.बी. स्वीच लावण्यात आले असून अन्य ६ ठिकाणी सदर प्रक्रिया सुरु आहे.

३) उच्च दाब व लघु दाब वाहिनीची दुरुस्ती/देखभाल करून तसेच उच दाब वाहिनीवर ए.बी. स्वीच बसविल्यामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

४) मुकुटबन येथे स्थायी लाईनमन तसेच कायम स्वरुपी निवासी सहायक अभियंताची नियुक्ती करण्यात आली आहे.

५) वीज बिल मुदत वेळेच्या आत वाटप करण्याबाबत संबंधित कंत्राटदारास योगय निर्देश देण्यात आले आहेत.

६) बॅक फिडींग साठी कायर-मुकुटबन लाईन दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

७) सद्य:स्थितीत आउट सोर्सिंग कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येत नाही. यवतमाळ मंडळ कार्यालयात नवीन तांत्रिक कर्मचारी उपलब्ध झाल्यानंतर मुकुटबन केंद्रास देण्यात येईल.

८) रुईकोट उप केंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही. वीज वाहिन्यांचे तसेच मुकुटबन येथील एल.टी.वीज वाहिन्यांचे मेंटेनन्स (दुरुस्ती) करण्याकरिता कंत्राटदारास निर्देश देण्यात आले आहेत.

९) वीज ग्राहकांना तक्रार नोंदविण्यासाठी तक्रार पुस्तिका मुकुटबन येथील वितरण केंद्रात ठेवण्यात आली असून ग्राहकांनी नोंदविलेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्यात येते. वीज बिल दुरुस्त करणे व वीज बिलाचा भरणा करण्याकरिता उपविभागीय कार्यालयातील बिलिंग स्टाफला आठवड्यातून एक दिवस मुकुटबन पाठविण्यात येते तसेच कुठल्याही पतसंस्थेमध्ये वीज बिल स्वीकारण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यास महावितरणच्या प्रचलित नियमानुसार प्राधान्याने वीज बिल भरणा केंद्र सुरु करण्यात येईल.

१०) अडेगाव येथील ३३/११ केव्ही उपकेंद्राचे काम अनुशेष योजनेतंर्गत प्रगतीपथावर असून त्यासाठी २२० के.व्ही. वणी उपकेंद्र येथून वीज पुरवठा घेण्यात येणार आहे.

११) मुकुटबन येथील ९५ स्ट्रीट लाईटची कामे प्रगती पथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी गुरुकुल प्रा.मा.नामांकित इसबावी, (ता.पंढरपूर, जि. सोलापूर) या संस्थेच्या संस्थाचालकावर बालमृत्यूचे गुन्हे दाखल असून अनेक मुलांचे शोषण सुध्दा होत असल्याबाबत**

**(४९) ६४१४९ (१२-०८-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी गुरुकुल प्रा.मा.नामांकित इसबावी, (ता.पंढरपूर, जि. सोलापूर) या संस्थेच्या संस्थाचालकावर बालमृत्यूचे गुन्हे दाखल असून अनेक मुलांचे शोषण सुध्दा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने या संस्थेस हेड सी-९९ साठी येणारे अनुदान तात्काळ थांबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी दिनांक २/५/२०१६ रोजी मा.अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार सदरहू संस्थेस मिळणारा निधी थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-१२-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) प्रस्तुत निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली असता सदर शाळेत पुरेशा सोयी सुविधा नसल्याने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये नामांकित निवासी शाळा योजनेंतर्गत या शाळेची निवड करण्यात आलेली नाही. तसेच या शाळेत नामांकित निवासी शाळा या योनजेंतर्गत यापूर्वी प्रवेशित केलेल्या ३०७ आदिवासी विद्यार्थ्यांना सोलापूर व घोडेगाव प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या इतर नामांकित शाळांमध्ये समायोजित करण्यात आलेले आहे. सबब, सद्यस्थितीत सदर शाळेत नामांकित निवासी शाळा योजनेंतर्गत अनुदान देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेगाव तालुक्यातील तित्रंव येथील विहरीवरील कनेक्शन बाबत**

**(५०) ६४३०१ (१६-०८-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेगाव तालुक्यातील तिंत्रव येथे शेतातील विहीरीवर वीज कनेक्शन मिळण्यासाठी १५ हजार रूपये अनामत रक्कम भरली असतांनाही एक वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी अद्यापर्यंत वीज कनेक्शन मिळाले नाही म्हणून शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबातील महिलेने उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर मुलाबाळांसह उपोषणाचा इशारा दिला होता हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबणाची कारणे काय आहेत.

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०१-२०१७)** :(१) व (२) हे अंशत: खरे आहे.
श्रीमती गोकुळाबाई श्रीकृष्ण हिंगणे, रा.तिंत्रव, ता.शेगाव, जि.बुलढाणा यांनी शेतातील विहिरीवर वीज कनेक्शन मिळण्याकरीता धडक सिंचन योजनेअंतर्गत दि.२९.४.२०१५ नुसार रु.५,१००/- रक्कमेचा भरणा केला असून दि.१५.०४.२०१६ रोजी सदर कृषी पंपाचे वीज कनेक्शन धडक सिंचन योजनेअंतर्गत देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.